महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई - ४०० ००१.

**क्रमांक : व्यशिप्र-२०२२/आस्था-२/प्र.क्र.२३/पदभरती/का-४** **दि.१४-०३-२०२३**

## परिपत्रक क्र.९

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील (Govt. ITI) विविध व्यवसायातील शिल्प निदेशक (Craft Instructor) (गट-क) संवर्गातील १४५७ पदे भरण्याकरिता दि.१७/०८/२०२२ रोजी www.dvet.gov.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता अर्ज सादर करण्यासाठी दि.१४/०३/२०२३ पर्यत असलेल्या मुदतीस **दि.१८/०३/२०२३ (रात्री ११.५९)** पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

ज्या दिव्यांग व्यक्तींकरिता जाहिरातीमध्ये त्यांच्या दिव्यांगत्वाच्या प्रकाराकरिता आरक्षित पदे नाहीत तथापि, सदर उमेदवार त्यांच्या सामाजिक/खुल्या प्रवर्गातून व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता अर्ज करण्यास इच्छूक असल्यास अशा उमेदवारांकरिता Divyang Category - Other या प्रकारातून अर्ज सादर करण्याची सुविधा **दि.१८/०३/२०२३ (रात्री ११.५९)** पर्यंत उपलब्ध राहील. तथापि, सदर उमेदवारांचा दिव्यांग आरक्षणांतर्गत निवड करावयाच्या पदांवर विचार केला जाणार नाही. तरी संबंधित दिव्यांग उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

सदर मुदतवाढ संपृष्टात आल्यानंतर ज्या उमेदवारांनी व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता परीक्षा शुल्क भरुन परिपूर्ण अर्ज सादर केले असतील अशा उमेदवारांना परीक्षा केंद्र तसेच यापूर्वी CBT-२ करिता परीक्षा शुल्क अदा केलेल्या पदांमध्ये वाढ करावयाची सुविधा (CBT-१ Application मध्ये पात्र ठरलेल्या पदांच्या मर्यादेत) संबंधित उमेदवारांच्या Login ID मध्ये **दि.२०/०३/२०२३ ते २३/०३/२०२३ (रात्री ११.५९ पर्यंत)** या कालावधीत उपलब्ध राहील. तथापि, याकरिता उमेदवारांनी दि.०८/०३/२०२३ ते १८/०३/२०२३ या कालावधीत व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता किमान एका पदासाठी परीक्षा शुल्क अदा करुन परिपूर्ण अर्ज सादर केलेला असणे आवश्यक राहील.

तरी उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-

( दि. अं. दळवी )

संचालक,

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-१.